**अर्जदारचा उलटतपास गैरअर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. डी. बी. सोळुंके यांच्यामार्फत शपथेवर सुरु**

१३. हे म्हणणे खरे नाही की, माझे लग्न गातेगाव येथे गैरअर्जदाराच्या घरी झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या लग्नाचा खर्च गैरअर्जदाराचा भाऊ आणि आई यांनी केला. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदार सोबत लहान–सहान कारणावरुन वाद करत होते. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदारला घर सोडून जाण्याची धमकी देत होते. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदाराने मला अनेकदा समजावून सांगण्याचा प्रयत्न केला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदाराकडे मुंबई येथे राहण्याकरीता वाद करत होते. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार मला माझे शिक्षण पूर्ण होऊदे त्यानंतर जाऊ असे म्हणत होते. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदाराकडे मुंबई येथे राहण्यास जाण्याकरीता हट्ट करत होते. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार माझ्या हट्टामुळे मुंबई येथे राहण्यास गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदाराने मला कधीही कसलाही त्रास दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदाराने माझ्याकडे कधीही पैशाची मागणी केली नाही.

१४. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१४ मध्ये मी कोणत्याही कारणाशिवाय गैरअर्जदारासोबत भांडण केले. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदाराला “तू मला पसंत नाहीस, मला तुझ्यासोबत लग्न करायचे नव्हते, तू दिसायला सुंदर नाहीस, तुझ्या सोबत राहण्याची इच्छा नाही“ असे म्हणून वाद केला होता.

१५. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ३०.१२.२०१५ रोजी मी गैरअर्जदारासोबत भांडण काढून त्याला मानसीक त्रास देऊन घरातून बाहेर काढले. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदाराला परत आला तर जीवे

मारण्याची धमकी दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार याला हाकलून दिल्यानंतर माझ्याविरुध्द काही होऊ नये म्हणून पोलीस स्टेशनला तो बेपत्ता असल्याची तक्रार दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदाराला शारीरीक सुखापासून वंचीत ठेवत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील पोलीस असल्यामुळे गैरअर्जदाराविरुध्द खोटे तक्रार अर्ज केले होते. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार बेपत्ता असल्याची तक्रार केल्यानंतर पोलीसांनी आम्हा दोघांना बोलावून एकत्र राहण्याचा सल्ला दिला होता व मला पती सोबत व्यवस्थीत रहा म्हणून समजावून सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, घरी परत आल्यानंतर मी स्वतःहून गैरअर्जदाराच्या घरातील सोन्याचे दागिने घेऊन घर सोडून गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी गैरअर्जदाराने मला आडवले होते आणि घर सोडून जाऊ नकोस असे समजावले होते. हे म्हणणे खरे नाही की, तेव्हा मी त्याला आत्महत्या करण्याची धमकी दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, मला गैरअर्जदार सोबत राहण्याची इच्छा नव्हती.

१६. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार सुशिक्षीत बेरोजगार आहे. माझ्या लग्नामध्ये दिलेल्या वस्तूंच्या पावत्या मी दाखल करण्यास तयार आहे. लग्नानंतर एक वर्ष दोन महिन्यानंतर माझ्या मुलाचा जन्म झाला. माझ्या मुलाची जन्म तारीख १३.०७.२०१२ आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार माझ्या मुलाचा सांभाळ करण्यास तयार आहे. परंतू माझ्या मुलाचा ताबा गैरअर्जदाराला देत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सासूचे वय ८० ते ९० वर्षांच्या दरम्यान आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार आणि चंद्रप्रकाश हे विभक्त राहतात. गैरअर्जदाराची बहिण तिच्या लग्नापासून तिच्या सासरी राहते. बाबूराव हे लातूर येथे राहतात. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार हा त्याच्या घरापासून

कुटुंबापासून विभक्त राहतो. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदाराने माझ्याकडे कधीही पैशाची मागणी केलेली नाही. गैरअर्जदार यांनी प्लॉट घेण्यासाठी पाच लाख रुपयांची मागणी केव्हा केली ती तारीख मला आठवत नाही. गैरअर्जदार बेपत्ता असल्याची तक्रार देण्याकरीता मी एकटीच गेले होते आणि ती तक्रार दिनांक ०१.०१.२०१६ रोजी दिली होती. त्या तक्रारीनंतर मुंबई मध्ये मी किती दिवस राहिले हे मला आठवत नाही. कामोठे पोलीस स्टेशनला मी चौकशीकरीता बऱ्याच वेळेस गेले होते. मी किती वेळा गेले होते हे मला निश्चित सांगता येत नाही. मी कामोठे पोलीस स्टेशनमध्ये दोन अर्ज दिले होते. ते अर्ज दिनांक १.०१.२०१६ रोजी आणि १८.०६.२०१६ रोजी दिले होते. दिनांक ०७.०७.२०१६ रोजी मी गैरअर्जदाराच्या घरी मुरुड येथे गेले होते. त्यावेळेस गैरअर्जदार यांनी मला जशी आलीस तशी परत जा असे म्हणून शिवीगाळ केली होती. मी दिनांक ०७.०७.२०१६ रोजीच्या घटनेबाबत तक्रार दिली नव्हती. सन २०१६ पासून गैरअर्जदाराविरुध्द औराद शहाजनी पोलीस स्टेशनला एक तक्रार, लातूर महिला तक्रार निवारण केंद्र येथे एक तक्रार दिली आहे. माझे माहेर हलगरा असल्याने मी औराद शहाजनी पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती. माझ्या सासरच्यांनी हलगरा येथे येऊन भांडण केले म्हणून मी तक्रार दिली. माझ्या सासरचे किती तारखेला आले होते हे मला सांगता येत नाही.

१७. माझे शिक्षण बारावी झाले आहे. माझे वडील माझ्या जन्मापुर्वीपासून पोलीस विभागात नोकरी करत होते. माझा भाऊ पोलीस विभागात नोकरी करतो. माझे वडील ज्या ठिकाणी नोकरी करत होते, त्याच ठिकाणी राहत होते. मी आजरोजी लातूर येथून आले. माझ्या वडीलांचे लातूर येथे घर आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी, माझे आई–वडील, भाऊ लातूर येथे

राहतो. हे म्हणणे खरे नाही की, हलगरा येथे माझे वडील राहत नसून त्यांचे तेथे घर आणि शेती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी हलगरा येथे केव्हाही राहिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांनी चूलत्यांविरुध्द हलगरा येथील घर वाटणीकरीता दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी नौकरी करत असून मला महिना १०,०००/– पगार आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास समर्थ आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील सर्व मजकूर खोटा आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृती,

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by GUNJAVATE APARNA SHIVAJI
Date: 2025.06.26 17:37:31 +0530

(श्रीमती.ए.एस.गुंजवटे)

दिनांक २६/०६/२०२५.
ठिकाण निलंगा.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, निलंगा
जिल्हा लातूर.
न्यायालय क्र.१.